वृत्तपत्राचे नांव :- महाराष्ट्र टाइम्स
वृत्तपत्र प्रकाशन ठिकाण :- मुंबई
वृत्तपत्र पान नं. :- 7
दिनांक :- 9/8/11
कटिंग नंबर :


बाप्पा मोरया...

# महिला पुरोहितांचे ठाम पाऊल


मनीषा नित्सुरे-जोशी




चातुर्मास म्हणजे व्रत-वैकल्य, पूजा-अर्चा, सणावारांचा काळ. या दिवसात भटजींचीही प्रचंड धावपळ असते त्यामुळे सणाच्या तयारीबरोबरच आधी भटजींचे बुकिंगही करावे लागते. या क्षेत्रात आता महिलांनीही पाऊल टाकले आहे.

खणखणीत आवाज आणि सुस्पष्ट शब्दोच्चाराच्या उपजत गुणांना संस्कृतचा अभ्यास आणि वेदपाठाच्या ज्ञानाची जोड देत महिला पूर्ण तयारीनिशी पौरोहित्याच्या क्षेत्रात उतरत आहेत. कधी पुरुष सहकाऱ्यांच्या बरोबरीने तर बहुतेकवेळा स्वतंत्रपणे महिला पौरोहित्य करू लागल्या आहेत. दादरच्या आशा जोशी, पवईच्या पुष्पा देवमाने, बदलापूरच्या सुनंदा रानडे, भांडुपच्या शिल्पा भाटकर, दादरच्या हर्षला साने, सुचेता शेंबेकर ही या क्षेत्रात आत्मविश्वासाने वावरणारी काही अनुभवी नावं. सत्यनारायण ते गणपतीच्या पूजेपर्यंत, वटपौर्णिमेपासून ते नवरात्रापर्यंत आणि वास्तुशांतीपासून ते एकसष्ठी, पंचाहत्तरी पर्यंत कुठल्याही शुभकार्याचे या महिला उत्तम पौरौहित्य करताहेत. सुनंदा रानडे यांनी पुरुषांची मक्तेदारी असलेल्या किहीम गावातून वीस वर्षांपूर्वी पौरोहित्य करायला सुरुवात केली होती. त्यानंतर त्यांनी आणखी चार महिलांना तयार केलं. रानडे म्हणाल्या, 'महिला उत्तम पौरोहित्य करू शकतात. चोख पाठांतर, अचूक ज्ञान आणि संयम महत्त्वाचा. आपण काय सांगतोय त्याचा अर्थ लोकांना समजावून सांगता आला पाहिजे. केवळ कर्मकांड करून चालणार नाही तर त्याबरोबरीने समाज प्रबोधनाचा संदेश पौरोहित्यातून देता यावा म्हणून मी पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनीने प्रकाशित केलेल्या कहाण्यांचा संदर्भ द्यायचे.' रानडे यांनी त्यांना मिळणारी दक्षिणा त्या त्या देवळांमध्ये तसेच सज्जनगड आणि वनवासी कल्याण आश्रमाला दान करण्याचा पायंडा पाडला आहे.

आशा जोशी यांनी पौरोहित्याबरोबरच गृहिणींसाठी वेदाभ्यासाचे वर्ग सुरु केले. त्या म्हणाल्या, 'पौरोहित्य करायचे तर उच्चार शास्त्रावर प्रभुत्व हवे. वेदाभ्यास शिकणाऱ्यांमध्ये सध्या निवृत्त महिलांची संख्या जास्त आहे. खरे तर तरुण गृहिणींनी या क्षेत्राकडे वळायला काहीच हरकत नाही. वेदाभ्यासामुळे ज्ञानात भर पडते.' पौरोहित्याचे क्षेत्र महिलांनी स्वतःसाठी खुले केले असून त्यांना समाजाची मान्यता मिळू लागली आहे. लग्न-मुंजीसारखी मोठी शुभकार्य करणाऱ्या महिला अपवादाने का असेना, पण तयार होऊ लागल्या आहेत.

### भेदभाव नसावा

आपल्याकडे अजूनही काही प्रमाणात महिला पुरोहितांना पुरुषांपेक्षा कमी दक्षिणा देण्याची मानसिकता असल्याचे मत या महिलांनी नोंदवले आहे. पौरोहित्याचे ज्ञान, अभ्यास, मेहनत यात महिला कुठेही कमी नसून दक्षिणा देताना मात्र असा भेदभाव करू नये असे त्यांचे सांगणे आहे.